# ७५ दिवाळीची गोष्ट

दिवाळीचा पहिला दिवस होता. **TV** वर एका प्रसिद्ध व्यक्तीची मुलाखत चालू होती. विषय अर्थातच दिवाळीचा सण हा होता. त्या प्रसिद्ध व्यक्तीने विषयाची चर्चा एका गोष्टीने केली. प्रथम ती गोष्टच सांगतो व नंतर माझ्या मनात उठलेल्या विचारांचे काहूर मांडतो.

एक आटपाट नगर असते. प्रजा सुखी असते परंतु राजा दुःखी असतो कारण त्याला संतती नसते. तपश्र्चर्येने फळ म्हणून त्याला कालांतराने संतती होते. पण संततीला एक शाप असतो. मुलाच्या लग्नाच्या दिवशी त्याचा मृत्यू होईल. वर्षामागून वर्षे लोटतात. राजकुमार मोठा होतो. राजा मनाविरूद्ध त्याच्या लग्नाचा घाट घालतो , थाटामाटाने लग्न होते. त्याच रात्री राजकुमाराचा मृत्यू होतो. यमदूत राजकुमाराला घेऊन यमाकडे येतात व स्तब्ध उभे राहतात. यम विचारतो की तुम्ही एवढे दुःखी कष्टी का ? हे तर तुमचे कामच आहे. यमदूत सांगतात की आज प्रथमच एखाद्याला अकाली मृत्यू येताना पाहून मन गलबलले. तेव्हा असे कठीण काम आम्हाला परत करावे लागू नये अशी इच्छा आहे. यम म्हणतो की जो कोणी दिवाळीचा सण साजरा करेल , दिवाळीच्या दिवशी दिवे लावेल , दिव्यांची आरास करील त्याला अपमृत्यू येणार नाही. तेव्हापासून दिवाळीला आपण सर्वजण दिव्यांची आरास करतो. दिव्यांची पूजा करतो. गोष्ट इथेच संपली. पण मनात विचारांचे काहूर माजले.

अपमृत्यू येणार नाही हे शब्द परत परत मनात येऊ लागले. ‘ मृत्यू ’ हे जीवनातील ‘ अंतिम सत्य ’ आहे. जन्म व मृत्यू आपल्या हातात नसतात. आपण फक्त मिळालेले आयुष्य जगू शकतो. हल्लींच्या दिवसात जीवनाची लांबी वाढली आहे. लोकसंख्येच्या त्रिकोणाचा आकार बदलून आयताकृती झाला आहे. पण अपमृत्यूचे प्रमाण घटले आहे ? उत्तर अर्थातच नाही असेच आहे.

दिवसेंदिवस मृत्यू कधी गाठेल व कोणत्या रितीने येईल हे कोणीच सांगू शकत नाही. असा एकही दिवस जात नाही की अपघाती मृत्यूची बातमी पेपरात , **TV** वर मिळाली नाही. **TV** साठी तर कोणताही अपघात हा ब्रेकींग न्यूजचा तास असतो. **TRP** वाढण्याची हमखास शक्यता. ‘ **Malthus** ’ नावाचा एक तत्ववेत्ता होऊन गेला. त्याने लोकसंख्येसंदर्भात त्या काळी भाकीत केले होते. त्याच्या मताप्रमाणे जेव्हा प्रमाणाबाहेर लोकसंख्या वाढेल तेव्हा निसर्ग कार्यरत होईल व लोकसंख्येला आळा घालेल. त्याचे शब्द काही प्रमाणात खरे होताना दिसतात. पण एकूण चित्र मात्र असेच दिसते कि मानवाने ब-यापैकी विजय मिळविला आहे. अर्थात सुनामी , ज्वालामुखी , भूकंप ह्यांची सुचना फारच कमी वेळ आधी मिळत असल्यामुळे व्हायची ती मनुष्यहानी होते. पण लोकसंख्येचा विचार केला तर होणा-या मनुष्यहानीचे प्रमाण फारच कमी असते.

हल्ली अपमृत्यू निसर्ग कोपल्यामुळे न होता , मनुष्याचा राक्षस झाल्यामुळे होत आहेत. एक मनुष्यच दुस-या माणसांच्या मृत्यूचे कारण बनत आहे. रोज जगात मानवी बॉबचे स्फोट होत आहेत , युद्धात माणसे मारली जात आहेत, बॉबस्फोट होत आहेत , रेल्वे व वाहनांचे अपघात होत आहेत व असंख्य माणसांचे अपमृत्यू होत आहेत. सरकार मेलेल्या व्यक्तीला नुकसान भरपाई देत आहे.

मला असा प्रश्न पडतो की ह्या सर्व लोकांनी दिवाळीच्या दिवशी दिव्यांची रोषणाई केली नसेल ?
मृत्यू हा शब्द ‘ शरीराचा नाश ’ ह्या अर्थी वापरला जातो. पण मृत्यू काय फक्त शरीराचाच होतो ? मनाच्या मृत्यूचे काय ? माणूस लहानाचा मोठा होतो स्वप्ने बघत , ध्येय ठरवित. काळाच्या ओघात बरीच स्वप्ने विसरली जातात , विरतात , पुरी होत नाही. वाटेतील अडचणी ठरविलेल्या ध्येयापासून माणसाला लांब नेतात. नशीबाची साथ मिळतेच असे नाही. काही वेळा ध्येय निश्र्चिती , स्वप्ने वास्तवाच्या कसोटीवर बेतलेलीच नसतात. कारण काही असो . ह्या स्वप्नांचा , ध्येयाचा एक प्रकारे मृत्यूच होत असतो. कर्मकरून सुद्धा केवळ नशीबाची साथ पुरेशी न मिळाल्यामुळे ठरविलेले ध्येय गाठता येत नाही व मिळालेल्या यशाला आपल्याला कवटाळवावे लागते. / स्वीकारावे लागते.